# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नवी मुंबई येथे एका तरूणाची झालेली हत्या

**(१) ७७५०५ (२१-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पोलीसांच्या दुर्लक्षामुळे श्री.स्वप्निल शिंदे या तरूणाची हत्या झाली असल्याचे मा.उच्च न्यायालयाने पोलीसांवर ठपका ठेवल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,स्वप्निलचा मृत्यू होण्यापूर्वी त्याच्या जिविताला धोका असल्याची तक्रार त्याच्या वडीलांनी पोलीसांना देऊनही पोलीसांनी त्यांची गंभीर दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने तत्कालीन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची सक्षम प्राधिकरणाद्वारे चौकशी करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१९) :** (१) प्राप्त अहवालानुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात स्वप्निल शिंदे नव्हे तर स्वप्निल सोनावणे या तरूणाची हत्या झालेली आहे.

(२) व (३) फिर्यादी यांच्या तक्रारीची दखल घेतली नाही व त्यांना कोणतीही मदत केली नाही या कारणांवरून नेरूळ पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस उप निरीक्षक व महिला पोलीस उप निरीक्षक या दोन पोलीस अधिका-यांना निलंबित करण्यात आले. सदर प्रकरणी सहा. पोलीस आयुक्त, वाशी विभाग, नवी मुंबई यांनी प्राथमिक चौकशी करून अहवाल मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना सादर केला. सदर प्राथमिक चौकशीचे अहवालावरून दोन्ही पोलीस अधिकारी यांना त्यांची पुढील देय वेतनवाढ दोन वर्षाकरीता रोखणे ही शिक्षा देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जादुटोणा विरोधी कायद्याचे प्रबोधन व प्रभावी अंमलबजावणीबाबत

**(२) ८५७५३ (०४-०९-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जादुटोणा विरोधी कायद्याच्या प्रबोधन व प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्यात आतापर्यंत ३५० हून अधिक गुन्हे वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात गुन्हे सिध्दतेचे प्रमाण कमी असल्याने संशयितांना शिक्षा होण्यास अडचणी उद्भवतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भातील संभाव्य अडचणी दूर होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१९) :**
(१) राज्यात सन २०१३ ते जुलै २०१८ या कालावधीत दाखल गुन्हे खालीलप्रमाणे.

| **सन** | **२०१३** | **२०१४** | **२०१५** | **२०१६** | **२०१७** | **२०१८ जुलै अखेर** |
|---|---|---|---|---|---|---|
| **दाखल गुन्हे** | २८ | ९१ | १३५ | १४५ | ९८ | ५० |

(२) व (३)
सन २०१३ ते जुलै २०१८ अखेर न्यायालयामध्ये सुनावणी पूर्ण झालेले व त्या गुन्ह्यांपैकी शाबीत झालेल्या गुन्ह्यांची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **वर्ष** | **निकाल लागलेले गुन्ह** | **शाबीत झालेले गुन्हे** | **दोषसिध्दी प्रमाण** |
|---|---|---|---|---|
| १ | २०१३ | ० | ० | ००.००% |
| २ | २०१४ | २ | १ | ५०.००% |
| ३ | २०१५ | ७ | ४ | ५२.१४% |
| ४ | २०१६ | १२ | २ | १६.६६% |
| ५ | २०१७ | ९ | ३ | ३३.३३% |
| ६ | २०१८ जुलै अखेर | १८ | ८ | ४४.४४% |

फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी राज्य शासनाने विविध धोरणात्मक उपाययोजना केल्या असून याव्दारे सर्व शासकीय अभियोक्ते, संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या नियंत्रणाखाली आणणे, शासकीय अभियोक्त्यांना

नियतकालिक प्रशिक्षण देणे, खटल्याच्या सुनावणीमध्ये दृक श्राव्य माध्यमाचा (Video Conferencing) वापर करणे, दोषारोप गुणवत्ता तपासणीकरीता मध्यवर्ती संनियंत्रण समिती स्थापित करणे, राज्यातील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांचे सक्षमीकरण करणे, ७ वर्ष किंवा ७ वर्षापेक्षा जास्त असलेल्या गुन्ह्यामध्ये सरकारी कर्मचारी पंच म्हणून घेणे, पोलीस अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालामध्ये दोषसिध्दीबाबत बजावलेली कामगीरी नोंद करणे इत्यादी प्रमुख बाबींचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वैजापूर (जि. औरंगाबाद) तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(३) ९३५७९ (१२-०८-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर (जि. औरंगाबाद) तालुक्यातून गेलेला नागपूर-मुंबई महामार्ग व तालुक्यातील इतर रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालुक्यातील १६० गावांना जोडणारे रस्ते अजूनही पक्के व सुस्थितीत नसून त्यांच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील नागपूर-मुंबई महामार्ग व इतर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१९) :**(१) हे खरे नाही.
तथापि, माहे जून, २०१७ च्या पूर्वार्धात पडलेल्या पावसामुळे प्रश्नाधीन रस्ते काही प्रमाणात क्षतिग्रस्त झाले होते.
(२) व (३) हे खरे नाही.
नागपूर-मुंबई महामार्ग हा प्र.रा.मा.दर्जाचा असून वार्षिक दुरुस्ती व देखभाल कार्यक्रमातंर्गत रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले आहेत.
तालुक्यातील तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांवरील दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जालना येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रातील महिलेने एका अल्पवयीन मुलीची राजस्थानमध्ये विक्री केल्याबाबत

**(४) १००५४६ (०६-०१-२०१८). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रातील महिलेने एका अल्पवयीन मुलीची राजस्थानमध्ये अडीच लाख रूपयामध्ये विक्री केल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१९) :**(१) सदर घटनेतील महिला आरोपी ही पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे नोकरीस अथवा कामावर नसून तिचा पोलीस प्रशिक्षण विद्यालयाशी काही एक संबंध नाही. सदर महिलेने पिडीत मुलीस लग्नाचे अमिष दाखवून तिला इतर आरोपींच्या मदतीने औरंगाबाद, पुणे व तेथून राजस्थान येथे पाठविले आहे.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून सदर बाजार पो.स्टे., जालना येथे गु.र.नं. ५९८/ २०१७ भादंवि कलम ३६३, ३४ प्रमाणे आरोपीतांविरूध्द दि. १८/०९/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. तद्नंतर पिडीतेने दिलेल्या जबाबावरून सदर गुन्ह्यात भादंवि कलम ३६६, ३६६ (अ), ३७६ (एन), ३७३, १०९ सह कलम ३ व १७ बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वये कलमात वाढ करण्यात आली. सदर गुन्ह्यात एकूण (११) आरोपींना निष्पन्न करण्यात आले असून त्यापैकी आरोपी क्र. १ ते ५ यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. २ हा अद्याप पावेतो न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. उर्वरित (०६) आरोपी मिळून न आल्याने त्यांना सीआरपीसी कलम २९९ प्रमाणे फरारी दर्शवून गुन्ह्यात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सदरचा गुन्हा मा. विशेष जिल्हा व सत्र नायाधिश, जालना यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून त्याचा स्पेशल कोर्ट केस क्र. ६३/२०१७ असा आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथे डीजे लावण्याच्या कारणावरून केलेली कुटुंबाला मारहाण

**(५) १०११८९ (०६-०१-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे डीजे लावण्याच्या कारणावरून कुटुंबाला मारहाण करणा-या चार पोलिसांना निलंबीत करण्यात आल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ठिकठिकाणी पोलिसांची सुरू असलेली गुंडगिरी आणि दादागिरी अशी अनेक प्रकरणे वारंवार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिसांच्या गुंडगिरी व दादागिरीवर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१९) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) पोलीस आयुक्त यांनी अमरावती शहर पोलीसांनी जनतेशी सौजन्याने वागावे व कारवाई दरम्यान जनतेला कोणताही त्रास होणार नाही याबाबत सूचना दिलेल्या आहेत तसेच प्रत्येक पोलीस स्टेशन अधिकारी यांना व त्यांचे अधिनस्त असलेले अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस दरबार मध्ये त्याचप्रमाणे परेडवर व रोलकॉलवर सदर सूचनांची जाणीव करुन देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे विभागातील माध्यमिक विद्यालयांना नियमबाह्य अनुदान वितरीत होत असल्याबाबत**

**(६) १०२६७८ (३०-१२-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे (ता.मावळ जि. पुणे) येथील कै.उषाताई लोखंडे चॅरिटेबल ट्रस्ट, संचलित माध्यमिक विद्यालय सागिसे यांनी विश्वस्त सभेत ठरावाद्वारे संस्थेला व शाळेला शासनाचे अनुदान नको असल्याबाबत लेखी पत्राद्वारे शिक्षण अधिकारी माध्यामिक पुणे याना कळविले हे खरे आहे काय,
(२) असल्यास शिक्षण आयुक्तालय पुणे यांनी स्पष्ट निदेश दिले असतानाही शिक्षण अधिकारी माध्यमिक पुणे यांनी संस्थेची कुठल्याही प्रकारचे मागणी नसतानाही अनुदानाचे सुमारे २ लक्ष ८० हजार रुपये परस्पर संस्थेच्या खात्यामध्ये जमा केले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास पुणे विभागातील अनेक शाळेनी आर्थिक अनियमितता असतानाही शासन अनुदान मिळण्यासाठी असलेल्या अटी व शर्तीचे निकषाचे उल्लंघन करुन अनुदानाचे वाटप केले असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे सदर गंभीर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे हेही खरे आहे काय,
(४).असल्यास सदर प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार दोषी आढळणाऱ्या व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र स्टेट मायनींग कार्पोरेशन कडून राज्यातील छोट्या उद्योगांसाठी सबसिडी देत असलेल्या कोळशाची तस्करी होत असल्याबाबत**

**(७) १०४०३५ (१३-०७-२०१८). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र स्टेट मायनींग कार्पोरेशन कडून राज्यातील छोट्या उद्योगांसाठी सबसिडी देत असलेल्या कोळशाची तस्करी करुन चोर बाजारात विक्री होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तस्करी करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२६-०२-२०१९) : (१)** हे खरे नाही.
(२) व (३) लागू नाही.

---

**नवी मुंबईत सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाची स्थापना करण्याबाबत**

**(८) १०५२९१ (०५-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रात विविध औद्योगिक आस्थापना, आय.टी पार्क, व्यापारी आस्थापना, हॉटेल्स, बांधकाम व्यवसाय इत्यादी प्रकारच्या आस्थापना कार्यरत असूनही कामगारांच्या विविध प्रश्नासाठी त्यांना ठाणे येथे जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगार, कामगार संघटना, विविध व्यवस्थापन प्रतिनिधी यांच्या कामगार विभागाशी संबंधित प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी नवी मुंबईत सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाची निर्मिती करण्यात यावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जुन, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा. कामगार मंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२२-०१-२०१९) :**(१) होय हे खरे आहे.

(२) होय,

नवी मुंबईत सहायक कामगार आयुक्त कार्यालयाची निर्मिती करण्यात यावी, याबाबत मा.श्री. संदीप गणेश नाईक, विधानसभा सदस्य यांनी दि.२३/६/२०१७ रोजी मा.मंत्री (कामगार) यांना निवेदन दिले आहे.

(३) उद्योजक/ व्यावसायिक व कामगार वर्ग यांच्या सोयीसाठी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राकरीता सहायक कामगार आयुक्त, नवी मुंबई कार्यालयाची निर्मिती करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून कार्यालयासाठी जागा उपलब्धतेबाबत पडताळणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(९) १०७०८८ (२७-०३-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम गत ७ वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) अकोले तालुक्यातील प्रशासकीय इमारतीस रु.२१४.७३ लक्ष किमतीस दिनांक १४.११.२००९ रोजी प्रशासकीय मान्यता व दिनांक १४.०१.२०११ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान करण्यांत आली होती. त्यानुसार दिनांक २८.१२.२०११ रोजी कार्यारंभ आदेश देण्यांत आले. परंतू तद्पश्चात प्रस्तावीत इमारतीच्या नकाशात बदल झाल्यामूळे विलंब झाला आहे. मार्च, २०१८ अखेर इमारतीचे स्थापत्य कामे पूर्ण झालेली असून रु.२३४.०९ लक्ष खर्च झाला आहे. सद्यस्थितीत सु.प्र.मा. घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## कळंब (जि. उस्मानाबाद) येथील मंजूर असलेल्या उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत

**(१०) १०८२१२ (३१-०३-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब, (जि. उस्मानाबाद) तालुक्यातील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु उपजिल्हा रुग्णालयास शासन निर्णय क्र. पदनि २०१५/प्र.क्र२७२/आरोग्य ३ दिनांक २ जानेवारी, २०१७ नुसार अधिकारीवर्ग व कर्मचारी वर्गाची पदे मंजुर झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू उपजिल्हा रुग्णालय त्वरीत सुरु करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्रव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील मंत्रालयाच्या पहिल्या मजल्यावर लागलेली आग

**(११) १०९६४६ (२७-०३-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मंत्रालयाच्या पहिल्या मजल्यावर दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजीच्या रात्री आग लागून त्यामध्ये मंत्रालयातील सर्व संगणकास जोडणारा मुख्य सर्व्हर जळाल्याचे तसेच सन २०१२ पासून ते अद्यापपर्यंत शॉर्टसर्किटमुळे मंत्रालयात चार वेळा आग लागण्याच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दिवशी रात्री साडे दहा वाजता म्हणजे कार्यालय बंद झाल्यानंतर कोणतेही कारण नसताना आग लागली असून शॉर्टसर्किटमुळे आग लागली असल्याचे संबंधितांनी दिलेले कारण संशयास्पद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर आग लागण्यास जाबाबदार असणाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच आग लागू नये म्हणून योग्य ती खबरदारी घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५६१ (९)

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे. तथापि, आग शॉर्टसर्किटमुळे लागलेली नाही.

(२), (३) व (४) सदर आगीच्या प्रकरणी विद्युत निरिक्षक, मुंबई निरीक्षण विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्यामार्फत चौकशी करण्यांत आली आहे. या चौकशी अहवालानुसार त्या ठिकाणचे विद्युत उपकरणे, विद्युत संच मांडणी व वातानुकूल यंत्रणा सुस्थितीत कार्यरत असल्याने सदर लागलेली आग ही विद्युत शॉर्ट सर्किटमुळे लागलेली नसून अन्य कारणाने लागलेली असावी, असे निष्कर्ष काढण्यांत आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयात लोकशाही दिनांच्या आढावा बैठकीस गैरहजर असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१२) ११०४३९ (२७-०३-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात लोकशाही दिनाच्या आढावा बैठकीस गैरहजर असणाऱ्या अधिकाऱ्यांवर जिल्हाधिकारी यांनी कारणे दाखवा नोटीशी बजावल्या असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकशाही दिनाच्या समन्वय समितीच्या बैठकीस प्रमुख विभागाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती नसल्यामुळे सामान्य नागरिकाचे प्रलंबित प्रश्न निकाली निघाले नाही आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त लोकशाही दिनाला गैरहजर असनाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१९) :** (१), (२) व (३) दिनांक ०१ जानेवारी, २०१८ रोजीच्या लोकशाही दिनास अनुपस्थित असणा-या जिल्हा क्रीडा अधिकारी, सोलापूर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सोलापूर व उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांना जिल्हाधिकारी सोलापूर यांनी दिनांक ०२/०१/२०१८ अन्वये कारणे दाखवा नोटीस दिलेली होती.

सदर लोकशाहीदिनादिवशी वरील अधिकारी यांच्या संबंधित विभागाशी संबंधित नागरीकांचे अर्ज नसल्यामुळे वरील अधिकारी यांच्या अनुपस्थितीमुळे सामान्य नागरिकांचे प्रश्न प्रलंबित राहिले नाहीत.

तथापि वरील अधिकां-यांनी सदर कारणे दाखवा नोटीशीला दिलेल्या खुलाश्याच्या अनुषंगाने, त्यांना प्रत्येक जिल्हा लोकशाहीदिनास व्यक्तीश: उपस्थित राहण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत समज देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कलेढोण (ता.खटाव, जि.सातारा) येथील विश्रामगृहाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१३) ११४४५६ (२७-०३-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कलेढोण (ता.खटाव, जि.सातारा) येथील विश्रामगृहाची प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झाली असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारस निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या विश्रामगृहाची दुरुस्ती करुन येथे आवश्यक सोयीसुविधा व कर्मचारी नियुक्त करण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर विश्रामगृह, हे मुख्यत: पाण्याची उपलब्धता पुरेश्या प्रमाणात नसल्याने सन २०१३ पासून बंद ठेवण्यांत आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बालमजुरीच्या उच्चाटनासाठी पर्यवेक्षीय समिती स्थापन करण्याबाबत**

**(१४) ११५३७६ (०४-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालमजुरीच्या उच्चाटनासाठी पर्यवेक्षीय समिती स्थापन करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनाला माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पर्यवेक्षीय समिती स्थापन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही, तथापि, दिनांक ०३.०७.२००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्य संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०८.०२.२०१८ रोजीच्या आदेशामध्ये सदरहू समिती पुनरुज्जिवीत/Revive करुन वरिष्ठतम अपर मुख्य सचिव यांनी नियंत्रक (Convener) म्हणून बैठक घ्यावी असे सूचित केले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही,

(३) प्रश्न उद्‌भवत नाही,

---

**मुंबईतील वाहतुकीचे व्यवस्थापन करण्यासाठी मेसर्स विदर्भ इन्फोटेक कंपनीला कंत्राट देण्यात आल्याबाबत**

**(१५) ११६५६४ (०३-०८-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहतुकीचे व्यवस्थापन करण्यासाठी मेसर्स विदर्भ इन्फोटेक कंपनीला कंत्राट देण्यात आले असून गेल्या एक वर्षाच्या कालावधीत दुचाकी व चारचाकी गाड्यांच्या टोईंगमधुन कंपनीला रुपये ९.२२ कोटी मिळाल्याचे माहितीच्या अधिकारात माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याने वाहनाच्या टोईंगचे काम वाहतूक पोलीसांनाच देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) मोटार वाहन कायदा, १९८९ कलम १२२ व महाराष्ट्र मोटार वाहन नियम २२२ मधील तरतुदीनुसार रस्त्यावर अनधिकृतरित्या उभ्या केलेल्या वाहनावर किंवा सार्वजनिक ठिकाणी / रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असल्यास, पोलीसांना सदर वाहनांवर कारवाई करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. तसेच मोटार वाहन कायदा, १९८९ कलम १२७ (२) व (३) अन्वये सार्वजनिक ठिकाणी / रस्त्यावर उभी असलेली वाहने टोईंग करण्याचा व त्याकरीता आवश्यक यंत्रणा उपलब्ध करुन घेण्याचा अधिकार पोलीसांना प्राप्त असून, त्यावर दंडात्मक रक्कमेव्यतिरिक्त टोईंगचे भाडे आकारण्याचे अधिकार देण्यांत आलेले आहेत.

मुंबई शहर वाहतुक पोलीसांना मोटार वाहन कायद्याची व नियमांची वारंवार अंमलबजावणी करावी लागते. सदर कारवाई करीत असतांना जी दंडात्मक कारवाई केली जाते त्यातील तडजोड रक्कम ही कलम १७७ अन्वये शासनाकडे भरणा केली जाते. वाहनांवर कारवाई करण्याकरीता विशिष्ट प्रकारच्या टोईंग वाहनाची व्यवस्था असते व त्याकरीता मनुष्यबळाचादेखील वापर करण्यांत येत असतो. मुंबई शहरामध्ये ३४ वाहतूक विभाग असून प्रत्येक वाहतूक विभागाला किमान २ टोईंग व्हॅनची आवश्यकता आहे. वाहतूक पोलीसांकडून सदरचे काम करुन घ्यावयाचे असल्यास वाहनासहीत मनुष्यबळ उपलब्ध करणे गरजेचे असून, सदरची बाब ही खर्चिक आहे. यास्तव टोईंगद्वारे वाहन उचलण्याचे कंत्राट देण्याबाबतचा निर्णय घेण्यांत आला आहे.

मे.विदर्भ इन्फोटेक प्रा.लि. यांनी टोईंग केलेल्या वाहनांवरील वाहतुक नियमांच्या उल्लंघनाच्या कारवाईची माहे जानेवारी, २०१७ ते जानेवारी, २०१८ या कालावधीतील रु. ६,२९,२७,६००/- इतकी दंडात्मक तडजोड रक्कम वसूल करुन शासनास भरणा करण्यांत आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यामध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(१६) ११७५२२ (३०-०७-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यामध्ये महिला असुरक्षित असून वसईमध्ये १२ वर्षाच्या मुलीने अब्रु वाचविण्यासाठी तिसऱ्या मजल्यावरुन उडी मारली तसेच एका टॅक्सीचालकाने धावत्या लोकलमध्ये एका विवाहितेला शिवीगाळ व मारहाण करीत विनयभंग केल्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१९) :** (१) वसईमध्ये १२ वर्षाच्या मुलीने तिसऱ्या मजल्यावरुन उडी मारली ही घटना खरी आहे. तथापि एका टॅक्सीचालकाने धावत्या लोकलमध्ये एका विवाहितेला शिवीगाळ व मारहाण करीत विनयभंग केल्याच्या घटनेबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा गुन्हा पालघर कार्यक्षेत्रात दाखल नाही.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून तुळींज पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३४६/२०१८ भा.दं.वि. कलम ३६३, ३५४ (ब) बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ ( पोस्को ) चे कलम ८ , १२ प्रमाणे एक अनोळखी इसमाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.

राज्यातील महिलांवर होणा-या अत्याचाराला आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना खालीलप्रमाणे आहे. :-

- महिलांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी महिला अत्याचार प्रतिबंधक विभागाची स्थापना करण्यात आली आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक हे विभागाचे प्रमुख आहेत.
- महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याकरीता राज्यात २७ विशेष न्यायालये व २५ जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.
- पोलीस आयुक्तालये / जिल्हयांमध्ये महिला सुरक्षा समित्या व महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.
- बलात्कारासारख्या गंभीर गुन्हयांचा तपासाची कार्यपध्दती बाबतच्या मार्गदर्शक सुचना सर्व पोलीस घटकांना वितरीत केलेल्या आहेत.

- हुंडाबळीकरीता प्रतिबंधात्मक उपाय प्रत्येक जिल्हयात दक्षता समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.
- छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पायी पेट्रोलिंग,शाळा कॉलेजच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना,नाकाबंदी, महिला सुरक्षा व छेडछाड पथके तयार करण्यात आली आहेत.
- मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली विशाखा निर्णयाप्रमाणे पोलीस घटकांमध्ये तक्रार समित्या (Complaint Committees) स्थापन करण्यात आल्या आहेत. कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा-२०१३ देखील अंमलात आला आहे.
- महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तपासासाठी आणि त्यांचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरावर दि.१२/१०/२०१७ च्य शासन निर्णयानुसार विशेष पथके गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे.
- राज्यात,मुंबईसह पुणे शहर, ठाणे शहर, नागपूर शहर, पुणे ग्रामिण, यवतमाळ, अहमदनगर येथे Investigation Units for Crime Against Women (IUCAW) स्थापन केली आहेत.
- दिनांक ३१.०३.२००८ रोजी राज्य गुन्हे अन्वेषण विभागात अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यात १२ घटकांमध्ये केंन्द्र शासन व राज्य शासनाच्या अधिपत्याखाली स्वतंत्र अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष स्थापन करण्यात आला आहे.
- समस्याग्रस्त महिलांचे समुपदेशन करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कक्ष स्थापन करण्यात आली आहेत.मा. धर्माधिकारी समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार रेल्वेस्टेशन परिसर व एस.टी. स्टँन्ड येथे एकुण ३६४ ठिकाणी महिला मदत केंन्द्रे सुरु करण्यात आली आहेत.
- मुंबई, ठाणे व नवी मुंबई क्षेत्रातील संकटातील महिलांच्या मदतीकरिता टोल फ्रि हेल्पलाईन क्र. “१०३” व उर्वरित क्षेत्राकरिता “१०९१” सुरु करण्यात आली आहे. रेल्वे पोलीस घटक, मुंबई व पुणे ९८३३३३१११११ , नागपुर ०७१२-२७४३९८४ व बृहन्मुंबई पोलीस घटकात २४ तास कार्यरत असणारी हेल्पलाईन सेवा कार्यरत आहे. याशिवाय www.mumbaipolice.org व comcell. mum. crime@ mahapolice. gov.in या वेबसाईटवर online तक्रार करता येते.
- महिलांवरील बलात्कार, विनयभंग, छेडछाड, ॲसिड हल्ला या अत्याचाराच्या गुन्हयामधील आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्याच्या दृष्टीने प्रचलित कायदयात सुधारणा करुन शासनाने फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१३ (२०१३ चा अधिनियम क्र.१३ पारित केला आहे.)

- Criminal Law Amendment No.२ of २०१८ नुसार बलात्कारांच्या गुन्ह्यांच्या शिक्षेत केलेली वाढ व तपासाबाबतच्या नवीन सुधारणांबाबतच्या सूचना दि.०९/०७/२०१८ रोजीच्या परीपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या आहेत.
- माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील महिलांच्या सुरक्षेच्या उपाययोजना सुचविण्यासाठी दि.२७/०७/२०१७ च्या शासन निर्णयानुसार समिती गठीत करण्यात आली आहे.
- राज्यात दि. ०१ जुलै, २०१५ ते दि. ३१ जुलै, २०१७ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ५ ऑपरेशन मुस्कान/स्माईल मोहिमेतंर्गत एकुण २०११२ हरवलेल्या बालकांचा शोध लावण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा व तालुका कामगार कार्यालयातील रिक्त पदांमुळे कामगारांची विविध प्रकरणे प्रलंबीत असल्याबाबत**

**(१७) ११९३१८ (२३-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या कामगार कार्यालय व तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या कामगार अधिकारी विभागाच्या कार्यालयातील विविध पदे रिक्त असल्यामुळे कामगारांच्या कामांमध्ये अडचणी येत असून कामगारांची नोंदणी धिम्म्या गतीने सुरु असल्याची बाब माहे एप्रिल-२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा कामगार कार्यालयात कायमस्वरुपी कामगार अधिकारी नसल्याने विविध योजनांचे दीड कोटी रुपये पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जिल्ह्यातील कामगार कार्यालयातील रिक्त पदांमुळे कामगारांना न्याय दिला जात नाही तसेच घरगुती कामगार व इमारत बांधकाम कामगारांची नोंद होत नसल्याने नोंदणीकृत कामगारांना विविध योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यशासनाने उक्त प्रश्नांबाबत आढावा घेऊन कामगांरांची प्रलंबीत प्रकरणे निकाली काढण्यासोबतच जिल्हा व तालुका कामगार कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२२-०२-२०१९) :** (१) सरकारी कामगार अधिकारी कार्यालय, बुलढाणा या कार्यालयासाठी एकुण २० पदे मंजूर असून त्यापैकी १० पदे कार्यरत आहेत आणि १० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे. तथापि, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत ३ कंत्राटी कर्मचारी नियुक्त केले असून इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत ९६४९ आणि घरेलू कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत ३६४१ कामगार नोंदीत करण्यात आले आहेत.

(२) व (३) अंशत: खरे आहे.
सरकारी कामगार अधिकारी, बुलढाणा या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असून इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत २५१० पात्र बांधकाम कामगारांना रु.१,९४,६४,३००/- इतक्या लाभाचे वाटप करण्यात आलेले आहे. तसेच घरेलू कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत १६४ पात्र घरेलू कामगारांना रु.१६,४०,०००/- इतक्या लाभाचे वाटप करण्यात आलेले आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत कामगारांसाठी विविध लाभांचे २१७८ अर्ज प्रलंबित असून सदर लाभ वाटपासाठी प्राप्त झालेल्या रक्कमेपैकी रु.२,०६,००,०००/- एवढी रक्कम शिल्लक आहे.

(४) सद्य:स्थितीत सरकारी कामगार अधिकारी संवर्गाची ५०% पदे रिक्त आहेत, तथापि कामगारांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी सरकारी कामगार अधिकारी, बुलढाणा या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार दुकाने निरिक्षक यांना देण्यात आला असून ३ कंत्राटी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयागामार्फत सरकारी कामगार अधिकारी पदावरील नियुक्तीसाठी ८ उमेदवारांची शिफारस करण्यात आली असून त्यांच्या नियुक्तीची कार्यवाही सुरु आहे. तसेच पात्र लिपिक-टंकलेखकांना दुकाने निरिक्षक श्रेणी-२ पदावर पदोन्नती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरूर (जि. बीड) तालुक्यात शासकीय विश्रामगृह बांधण्याबाबत

**(१८) १२१११३ (२०-०७-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (जि.बीड) तालुक्याच्या मुख्यालय निर्मितीपासून ते अद्यापपर्यंत शासकीय विश्रामगृह उभारण्यात न आल्याने विविध शासकीय कामासाठी येणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच लोकप्रतिनिधी यांची निवासासाठी मोठ्या प्रमाणात गैरसोय होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून शिरूर तालुक्यात शासकीय विश्रामगृह बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १८.०९.२००२ रोजी झालेल्या बैठकीत सध्या नवीन विश्रामगृहे बांधण्यात येऊ नये अशा निर्णय झाला आहे. त्यामुळे शिरुर येथे विश्रामगृहाचे बांधकाम करण्यांत आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनाळा धरणामध्ये (जि.वाशिम) जमीनी गेलेल्या गावात**
**पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाल्याबाबत**

**(१९) १२१५१० (२०-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील सोनाळा धरणावरुन जवळपास २० गावांमध्ये पाणीपुरवठा होत असुन धरणामध्ये जमीनी गेलेल्या गावात जि.मृतपाणी साठ्यामुळे पाणी मिळणे कठीण झाले असुन धरणासाठी जमिनी देऊन भुमिहीन लोकांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने सोनाळा धरणावरुन धरणात पाणीसाठा उपलब्ध नसतांना पाईप लाईन टाकुन संबंधित नगर परिषद मात्र तात्पुरत्या योजनेच्या मदुतवाढीसाठी हट्ट करीत असुन शासनाने योजनेला मुदत वाढ दिल्याने नागरिकांने विरोध केला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पाणी मिळण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२१-०२-२०१९) :** (१) होय,

(२) सदर योजनेबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांनी चौकशी केली आहे. सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीत मंगरुळपीर शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत तातडीच्या तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर योजनचे ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

(३) सदर योजनेचे काम पूर्ण होण्यास स्थानिक नागरिकांचा विरोध होत असल्यामुळे विलंब झालेला आहे.

---

**महाराष्ट्र सदन प्रकरणी शासनाचे नुकसान झाल्याबाबत गैरवाजवी निष्कर्ष**
**काढून गुन्हे दाखल करण्यात आल्याबाबत**

**(२०) १२२७९८ (३०-०७-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सदन बांधकामाचे कंत्राट मे.के.एस.चमणकर इंटरप्रायजेस या कंपनीला विनानिविदा दिल्याबाबत दिनांक १८ जुलै, २०१३ व दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम, यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार प्राप्त झाल्यामुळे दिनांक ११ डिसेंबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकांनी महाराष्ट्र सदनासंदर्भात शासनास गुप्त चौकशीचा अहवाल सादर करून सदर प्रकरणी अधिक चौकशीची परवानगी मागितल्यामुळे शासनाने यास परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक परिवहन विभागाच्या स्लम व नॉन स्लम संपूर्ण भूखंडावर झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्याकरिता सदर विभागाने दिनांक २६ मे, २००३ व दिनांक ३ जानेवारी, २००४ रोजी वा त्यासुमारास 'ना हरकत प्रमाणपत्र' दिल्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक २७ ऑक्टोबर, २००४ रोजी संपूर्ण भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर करून त्यानुसार सन २००५ मध्ये प्रादेशिक परिवहन विभागाच्या भूखंडावर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचे काम चालू झाले , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या दिनांक २२ मार्च, २००४ रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र सदनाचे बांधकाम खाजगीकरणातंर्गत करण्याचा निर्णय होवून त्यानुसार मे.नोबेल कंस्ट्रक्शन कंपनीला काम देण्यात आले होते तसेच दिनांक ५ मे, २००६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ पायाभुत सुविधा समितीच्या बैठकीमध्ये चर्चा होवून प्रादेशिक परिवहन विभागाच्या नॉन स्लम भूखंड चटई क्षेत्राचे रुपये १०० कोटी असे मुल्यांकन मान्य करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रादेशिक परिवहन विभागाचा अंधेरी (पश्चिम) येथील भूखंड विकासकाला दिला असा आरोप लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्या एफ.आय.आर. मध्ये केला आहे , हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तज्ञांचे अहवाल येण्यापूर्वीच माहे एप्रिल, २०१५ मध्ये प्रादेशिक परिवहन विभागाच्या नॉन स्लम भूखंडाच्या क्षेत्रफळाचे मुल्यांकन करतांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शासनाचे अपरिमित नुकसान झाल्याचा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने निष्कर्ष काढला त्यानुसार महासंचालक एसीबी यांनी दिनांक ४ जुन, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यासाठी परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, एस.आर.ए कडून दिनांक ९ जुन, २०१५ रोजी प्राप्त झालेल्या पत्राची दाखल न घेता तसेच प्राप्त करण्यात आलेल्या खाजगी व्हॅल्युअरच्या अहवालाची सत्यता न पडताळता व कोणतीही तपासणी न करता त्यांचा अहवाल स्विकारून त्या आधारे शासनाचे अपरिमित नुकसान झाल्याचा दिनांक ११ जुन, २०१५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्या एफआयआर मध्ये निष्कर्ष काढला, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाचे नुकसान झाल्याचा गैरवाजवी निष्कर्ष काढून अन्यायकारकरित्या दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१९) :** (१), अंशत: खरे आहे.

(२), अशंत: खरे आहे. प्रादेशिक परिवहन विभागाच्या स्लम व नॉन स्लम संपूर्ण भूखंडावर झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्याकरीता सदर विभागाचे दिनांक २६ मे,२००३ व दिनांक ३ जानेवारी, २००४ रोजी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. दिनांक २७.१०.२००४ रोजी झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण यांनी विकासक मेसर्स के एस चमणकर एंटरप्रायजेस यांना Letter of Intent मंजूर केले.

(३) होय. दिनांक ५.०५.२०१६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीमध्ये चर्चा होवून प्रादेशिक परिवहन विभागाच्या नॉन स्लम भूखंड चटई क्षेत्राचे रूपये १०० कोटी असे मूल्यांकन मान्य करण्यात आले होते.

(४) होय. कारण सार्वजनिक बांधकाम विभागाने विकासकाच्या विकासप्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल/स्टेटस रिपोर्ट मंत्रीमंडळ पायाभूत सोयीसुविधा समितीच्या बैठकीत मांडताना, विकासकाचा जास्तीचा होणारा फायदा जाणूनबुजुन दर्शविण्यात आला नव्हता. त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे असे प्रकल्प मंजूर करतानाचे नियम डावलण्यात आले होते. तसेच शासकीय भूखंडाचा खाजगीकरणातून विकास करणे अथवा भूखंडावरील पोटेंशिअल एफएसआय खाजगी विकासकास एसआरए व अन्य प्रकल्पासाठी करुन देणे हा विषय मंत्रीमंडळ पायाभूत समितीच्या कार्यकक्षेतील नसताना नमूद प्रकल्प मंजूरीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीसमोर ठेवला.

(५) सदर प्रकरणामध्ये चौकशी अधिकारी यांनी विविध विभागाकडून कागदपत्र प्राप्त केली. त्या कागदपत्रामधिल माहीती तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या आधारे उपलब्ध पुराव्यांची मांडणी करण्यात आली. अशी उपलब्ध पुराव्यांची करण्यात आलेली मांडणी वरिष्ठांना अवगत करण्यात आली. तसेच नमूद प्रकरणात नियुक्त करण्यात आलेले विषय तज्ञ यांच्या समवेत चौकशी अधिकारी यांनी वेळोवेळी चर्चा केल्या. अश्या प्रकारे प्रकरणाची सर्वांगिण चौकशी केल्या नंतर दिनांक ११.०६.२०१५ रोजी एकूण १७ आरोपी विरूध्द प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आलेला आहे.

(६), हे खरे नाही.

(७) व (८) दाखल करण्यात आलेले गुन्हे हे कागदोपत्री पुराव्यावर आधारीत असून ते गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत. असे गुन्हे कागदोपत्री पुराव्यावर आधारीत असल्याने ते मागे घेण्याचा प्रश्नच येत नाही.

---

## वसई तालुक्यात (जि.पालघर) माहितीच्या अधिकारात माहिती मागवून खंडणी मागितल्याप्रकरणी राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आल्याबाबत

**(२१) १२३५८१ (३०-०७-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहितीच्या अधिकारात माहिती मागवून खंडणी मागितल्या प्रकरणी विरार, नालासोपारा आणि तुळींज पोलीस ठाण्यात माहे मार्च, २०१८ च्या शेवटच्या सप्ताहामध्ये वा त्या दरम्यान राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून त्यांचेवर कोणत्या कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५६१ (१९)

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. वसई तालुक्यात (जि.पालघर) माहितीच्या अधिकारात माहिती मागवून खंडणी मागितल्या प्रकरणी विरार, नालासोपारा, तुळीज, वसई आणि वालिव पोलीस ठाण्यात तक्रारदारांनी तक्रार दिल्याप्रमाणे मार्च,२०१८ ते मे,२०१८ दरम्यान आरोपींतांवर खालीलप्रमाणे २४ गुन्हे दाखल झाले असून सदर गुन्ह्यांमध्ये काही आरोपी हे राजकीय पक्षाशी संबंधीत आहेत :-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं | भादंविसं कलम |
|---|---|---|---|
| १ | विरार | ३८१/१८ | ३८४, ३८६, ५०६ (२,) ३४ आर्म्स ॲक्ट, ३, २५ |
| २ | विरार | ४०२/१८ | ३८४, ३८५, ३८६, ५००, ५०६, ३४ |
| ३ | विरार | ४१३/१८ | ३८४, ३८६, ३४ |
| ४ | विरार | ४३०/१८ | ३८४, ३८६, ५०४, ५०६, ३४ |
| ५ | विरार | ४४६/१८ | ३८४, ३८६, ३४ |
| ६ | विरार | २९५/१८ | ३८५, ५०४, ५०६, ३४ |
| ७ | वसई | ९१/१८ | ३८४, ३८६, ३४ |
| ८ | वसई | ६७/१८ | ३८४ सह अनु.जाती/जमाती अत्या.प्रति. कायदा कलम ३ (आर)(एस) |
| ९ | वसई | ९२/१८ | ३८४, ३८६, ३४ |
| १० | वसई | ९३/१८ | ३८४, ३८६, ३४ |
| ११ | वसई | १००/१८ | ३८४, ३८६ |
| १२ | वसई | १४४/१८ | ३८४, ३८५, ५०६ |
| १३ | वसई | १४५/१८ | ३८४, ३८६, ३४ |
| १४ | वसई | ३३०/१८ | ३८४, ३८६, ३४ आर्म्स ॲक्ट, ३,२५ |
| १५ | तुळीज | ३३१/१८ | ३८४, ३८६, ५०६, ३४ |
| १६ | तुळीज | ३४८/१८ | ३८४, ३८६, ५०६ (२), ३४ |
| १७ | तुळीज | ३६५/१८ | ३८४, ३८६, ३४ |
| १८ | तुळीज | ३८६/१८ | ३८४, ३८६, ३४ |
| १९ | तुळीज | ४८६/१८ | ३८४, ३८६, ५०६, ३४ |
| २० | नालासोपारा | १२३/१८ | ३८५, ५०६, ३४ |
| २१ | वालीव | २७१/१८ | ३८४, ३८६, ३८७, ४४८, ३४ आर्म्स ॲक्ट, २५(१)(अ) |
| २२ | वालीव | १३२/१८ | ३८५, ३२३, ५०४ |
| २३ | वालीव | २९०/१८ | ३८५, ३४ |
| २४ | वालीव | ४४७/१८ | ३८७, ३४ |

वरील सर्व गुन्ह्यात एकूण २७ आरोपीत यांना अटक करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळकोट (जि.लातूर) तालुक्यात शासकीय विश्रामगृह बांधण्याबाबत**

**(२२) १२३६४६ (२०-०७-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (जि.लातूर) तालुक्याची निर्मिती सन १९९९ मध्ये झाली असून या तालुक्याच्या ठिकाणी शासकीय विश्रामगृह नसल्याचे माहे मे, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहामध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी विश्रामगृहासाठी संबंधितांकडे वारंवार मागणी केली असून अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून जळकोट येथे शासकीय विश्रामगृह बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १८.०९.२००२ रोजी झालेल्या बैठकीत सध्या नवीन विश्रामगृहे बांधण्यात येऊ नये अशा निर्णय झाला आहे. त्यामुळे जळकोट येथे विश्रामगृहाचे बांधकाम करण्यांत आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथे अनेक वर्षापासून चोरीच्या ट्रकची विक्री केली जात असल्याबाबत**

**(२३) १२४७०३ (३०-०७-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील बायजीपुरा येथील एमआयएम पक्षाचा नगरसेवक शेख जफर व त्याचा भाऊ शेख बाबर हे मागील अनेक वर्षापासून चोरीचे ट्रक आणि वाहने नवीन करुन विकत असल्याचे व त्यांनी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक तरी वाहन विक्री केल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिकलठाण्यातील टाटा बॉडी बिल्डर या गॅरेजमध्ये मागील अनेक वर्षापासून चोरीचे वाहन आणून त्यांची रंगरंगोटी करण्यात येऊन वाहनाचा मुळ चेसीस क्रमांक काढून त्यावर बनावट चेसीस क्रमांक गॅस वेल्डिंगच्या सहाय्याने लावण्यात येत होता व या वाहनांची बीड आरटीओ कार्यालयातून बोगस कागदपत्रांच्या आधारे पासिंग करण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५६१ (२१)

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर येथे १, ठाणे शहर येथे १, नवी मुंबई येथे १, पोलीस अधिक्षक,औरंगाबाद ग्रामीण येथे,१, जालना येथे १ आणि नंदूरबार येथे १ असे एकूण ६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

(२) औरंगाबाद चिखल ठाण्यातील टाटा बॉडी बिल्डर या गॅरेजचे मालक चोरीच्या ट्रकचे चेसीस व इंजिन नंबर तसेच गाडीची रंगरंगोटी बदली करुन गाडी विक्री करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सिडको एमआयडीसी पो.स्टे. औरंगाबाद गुरनं १००/२०१८ भादंविस कं ४२०,४६८,४७१,३४, या गुन्ह्यात आरोपीला अटक करण्यात आली आहे. परराज्यातून आलेल्या वाहनांची ट्रान्सफर एनओसीची माहिती संबंधीत आरटीओ कार्यालयाकडून घेण्यात येत आहे. एनओसी कागदपत्रांची तपासणी करुन बीड आरटीओ कार्यालयाकडून किंवा इतर आरटीओ कार्यालयाकडून चोरीच्या गाड्यांचे रजिस्ट्रेशन केले आहे काय व कागदपत्र कोणी तयार केले आहे, कागदपत्रे बनावट तयार केले किंवा कागदपत्रानुसार चेसीस नंबर ओव्हर रायटींग केलेले आहे याबाबत सविस्तर तपास सुरु आहे.

(३) सदर प्रकरणी खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे :-

(अ) औरंगाबाद शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत एमआयडीसी सिडको पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १००/२०१८ भादंवि कलम ४२०,४६८,४७१, ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असून ३ आरोपींना अटक करण्यात आली असून एक आरोपी फरार आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(ब) नारपोली पो.स्टे. गु.रजि.नं. २०/२०१८ भादंवि ४६५,४६७,४६८,४७४,१२०(ब), ४२०, २०१,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात २१ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(क) जालना जिल्ह्यात भोकरदन पोलीस ठाणे येथे गु.र.क.१४७/२०१८ भादंवि कलम ३७९,४२०,४६५, ४६८,४७०,४०६,३४ अन्वये गुन्हा नोंद केला असून ३ आरोपींना अटक करण्यात आली असून २ आरोपी फरार आहेत. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(ड) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत खारघर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.८०/२०१७ भादंवि कलम ३७९,४६५,४६७,४६८,४७१,४२०,४७४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून एका आरोपीस अटक करुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(इ) औरंगाबाद ग्रामीण जिल्ह्यातील खुल्ताबाद पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३७५/२०१७ भादंवि कलम ३७९,४२०,४६८,४७१ अन्वये गुन्हा दाखल केला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(फ) नंदूरबार शहरपोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६६/२०१८ भादंवि कलम ४२०,४६८,४७१,४६७ अन्वये गुन्हा दाखल केला असून ४ आरोपींना अटक केली त्यातील ३ आरोपींना नारपोली पो.ठा. येथील गु.र.क्र.२०/२०१८ या गुन्ह्यात अटक केली असून सदर आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शिवडाव (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील सर्व्हे नंबर २६७/५ मधील क्रशरकरिता अवैधरित्या स्फोटकांची वाहतूक होत असल्याबाबत**

**(२४) १२६३४९ (०४-०८-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिवडाव (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील सर्व्हे नंबर २६७/५ मध्ये श्री. चंद्रशेखर वसंत सावंत यांना क्रशरसाठी परवानगी देण्यात आली असून ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातून स्फोटकांची खरेदी करत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ते कोल्हापूर जिल्हा किंवा अन्य ठिकाणाहून स्फोटकांची खरेदी करून त्याबाबत शासनाची कोणतीही परवानगी न घेता अवैधरीत्या स्फोटकांची वाहतूक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर क्रशरच्या ठिकाणी जिल्हा प्रशासनाची कोणतीही परवानगी न घेता ते स्फोटकांचा साठा करीत असून अप्रशिक्षित कामगारांमार्फत स्फोटकांची हाताळणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्रशरच्या ठिकाणी अनधिकृतरीत्या स्फोटकांचा साठा व वाहतूक केल्याप्रकरणी संबंधित क्रशरच्या सर्व परवानग्या तात्काळ रद्द करून श्री. चंद्रशेखर वसंत सावंत यांचेवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यासंदर्भात कस्तुरीमृग फाउंडेशनच्या वतीने माहे जून,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेपाशी तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१९) :** (१) व (२) सदर क्रशरकरीता लागणा-या स्फोटकांची खरेदी श्री. चंद्रशेखर वसंत सावंत हे अधिकृत स्फोटक परवानाधारक श्री. गौरीहर मनोहर शेटये, जि.सांगली यांचेकडून करुन स्फोटक वाहतुकीचा आवश्यक परवाना असलेल्या वाहनातून वाहतूक करतात.

(३) हे खरे नाही. श्री. चंद्रशेखर वसंत सावंत हे अधिकृत स्फोटक परवानाधारक श्री. गौरीहर मनोहर शेटये, जि.सांगली यांचेकडील प्रशिक्षित कामगारामार्फत स्फोटकांची हाताळणी करीत असून क्रशरच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा स्फोटकांचा साठा केलेला नाही.

(४) हे खरे आहे.

(५) या प्रकरणी तहसीलदार कणकवली यांनी चौकशी केली असून सदर क्रशरकरीता लागणा-या काळ्या दगडाच्या उत्खननाकरीता जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग यांनी ५ वर्ष मुदतीचा गौणखनिज खाणपट्टा दि.११/०४/२०१७ रोजी श्री. चंद्रशेखर वसंत सावंत यांना मंजूर केला आहे. सदर क्रशरकरीता लागणा-या स्फोटकांची खरेदी श्री. चंद्रशेखर वसंत सावंत हे अधिकृत स्फोटक परवानाधारक श्री. गौरीहर मनोहर शेटये, जि. सांगली यांचेकडून करतात. श्री. गौरीहर मनोहर शेटये, प्रशिक्षित कामगारामार्फत स्फोटकांची हाताळणी करीत असून क्रशरच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा स्फोटकांचा साठा केलेला नाही असे चौकशीत दिसून आले.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी लोकप्रतिनिधींसोबत केलेले गैरवर्तन**

**(२५) १२७९९७ (१०-१२-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.अमितेश कुमार यांनी लोकप्रतिनिधींसोबत केलेले गैरवर्तन आणि बेकायदेशीर कारवाई करून जाणीवपूर्वक लोकप्रतिनिधींचा केलेला अपमान याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पोलीस प्रशासन यांच्याकडून माहिती घेतली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार शासनाने श्री.अमितेश कुमार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१९) :** (१) गृह विभागातील चर्चे दरम्यान, मा.सदस्यांनी पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्या संदर्भात उपस्थितीत केलेल्या मुद्दयांबाबत, 'अधिवेशन संपण्यापूर्वीच उचित कार्यवाही केली जाईल' असे आश्वासन दिले होते. हे खरे आहे.

(२) होय.

(३), व (४) मा. सदस्यांनी सभागृहात उपस्थितीत केलेल्या मुद्यांविषयी विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती यांच्याकडून चौकशी करण्यात आली असून, उपस्थितीत केलेल्या आरोपात तथ्य नसल्याचे निर्देशनास आल्याने कारवाई केलेली नाही.

---

**बॉम्बे हायकोर्टाचे 'मुंबई उच्च न्यायालय' असे नामकरण करण्याबाबत**

**(२६) १२८०२२ (०५-१२-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बॉम्बे हायकोर्टाचे 'मुंबई उच्च न्यायालय' असे नामकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची हरकत नसल्याबाबत राज्यशासनाने दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास केंद्र शासनास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नामकरण करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुराव्यादाखल शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे. तथापि 'बॉम्बे हायकोर्ट चे' 'मुंबई उच्च न्यायालय' असे नामकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची हरकत नसल्याबाबत राज्यशासनाने दिनांक १७ जानेवारी, २००५ च्या पत्रानुसार केंद्र शासनास कळविले आहे.

(२) या संदर्भात स्मरणपत्राद्वारे केंद्र शासनाकडे नियमीत पाठपुरावा केला जात असून शेवटचे स्मरणपत्र दिनांक १०.१०.२०१८ रोजी केंद्र शासनास पाठविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या निधीबाबत

**(२७) १२८०३० (२९-१२-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतून सन २०१८ - २०१९ या वर्षाकरिता सिंधुदुर्ग जिल्हयातील २२८ गावाकरिता १३४ योजना मंजूर करण्यात आल्या असून त्यासाठी रुपये ३० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मंजूर योजनेतून सिंधुदुर्ग जिल्हयातील (तालुकानिहाय) कोणकोणत्या गावातील योजनांची कामे हाती घेण्यात आली आहेत, सदर योजनांच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सन २०१८- १९ या वर्षाकरिता सिंधुदुर्ग जिल्हयातील २२८ वाडयांकरिता १३३ योजना मंजूर करण्यात आल्या असून त्यासाठी रुपये ३० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समाविष्ट १३३ योजनांची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे-
सन २०१८-१९ योजनांची सद्यस्थिती

| तालुका | योजना | वाड्या | कामे सूरू | प्रशासकीय मान्यता | अंदाजपत्रक तयार केलेल्या योजना | तांत्रिक छाननी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वैभववाडी | ८ | १० | ४ | ० | ३ | १ | ८ |
| कणकवली | १० | १५ | १ | ५ | १ | ३ | १० |
| देवगड | १५ | ३१ | ५ | ८ | २ | ० | १५ |
| मालवण | २८ | ३० | ३ | १५ | ३ | ७ | २८ |
| कुडाळ | २७ | ४५ | ११ | ६ | १ | ९ | २७ |
| वेंगुर्ला | १३ | २७ | ४ | २ | ६ | १ | १३ |
| सावंतवाडी | २२ | ४४ | ६ | ३ | ५ | ८ | २२ |
| दोडामार्ग | १० | १५ | २ | ० | २ | ६ | १० |
| एकूण | १३३ | २१७ | ३६ | ३९ | २३ | ३५ | १३३ |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात आदिवासीबहुल भागात एक हजार क्षमतेचे पोलीस प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित करण्याबाबत**

**(२८) १२८३१४ (०७-१२-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील आदिवासीबहुल भागात गत तीन वर्षापूर्वी एक हजार क्षमतेच्या पोलीस प्रशिक्षण केंद्राला शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस प्रशिक्षण केंद्राचा भूमिपूजन सोहळा संपन्न झाल्यानंतरही अद्याप केंद्राच्या बांधकामाला सुरुवातही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम अद्याप सुरू न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या केंद्राचे बांधकाम करून ते कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.टीईएक्स-०३०८/प्र.क्र.१६०/पोल-५अ, दि.०६/०४/२०१० अन्वये पांढरकवडा, जि.यवतमाळ येथे नविन पोलीस प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली होती. तथापि, प्रत्यक्षात बांधकाम सुरुवात झालेली नाही. सद्यस्थितीत प्रशिक्षणासाठी येणाऱ्या प्रशिक्षणार्थीकरीता उपलब्ध प्रशिक्षण केंद्रे पुरेशी असल्याने पांढरकवडा, जि.यवतमाळ येथे नविन पोलीस प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याची आवश्यकता नाही, असे पोलीस महासंचालक यांनी कळविल्याने पांढरकवडा, जि.यवतमाळ येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे बांधकाम करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात आला आहे.

---

**राज्यातील लाचखोरीच्या प्रकरणांबाबत**

**(२९) १२८८५४ (०७-१२-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून ( एसीबी) दिनांक १ जानेवारी ते १ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत रचलेल्या सापळ्यात ३१ विभागातून राज्यातील ६९६ व्यक्ती लाचखोरीच्या प्रकरणात अडकल्या असून त्यामधून ९२ लाख ६५ हजार ९७८ रुपयांचा महसूल गोळा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यसरकारच्या खातेनिहाय व्यक्तींची संख्या पाहता लाचखोरी प्रकरणामध्ये पोलिस खात्यामधील कर्मचारी सर्वाधिक असल्याची बाब लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित झालेल्या माहितीतून उघड झाल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील लाचखोरीमध्ये सन २०१७ च्या तुलनेत यंदाच्या ८ महिन्यांच्या कालावधीत लाचखोरीच्या प्रमाणात वाढ झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील वाढत्या भ्रष्टाचाराला प्रतिबंधित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) जानेवारी ते ०१.१०.२०१८ या कालावधीत रचलेल्या सापळयात ३१ विभागातून राज्यातील ६९६ व्यक्ती लाचखोरीच्या प्रकरणात अडकल्या असून त्यामधून ९२ लाख ४१ हजार ९७८ रुपयांचा सापळा रक्कम होती.
(२) १ जानेवारी ते दिनांक ०१.१०.२०१८ या काळात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून महसूल विभागावर ११५ गुन्हे नोंद असून त्यामध्ये एकूण १२६ लोकसेवकांवर कारवाई करण्यात आली. पोलीस विभागावर १०९ गुन्हे नोंद असून त्यामध्ये १३६ लोकसेवकांवर कारवाई करण्यात आलेली आहे.
(३) नाही.
(४) व (५) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत मोबाईल ॲप, टोल फ्री.क्रं. १०६४, ही हेल्पलाईन, ९९३०९९७७०० हा Whatsapp नंबर तसेच Facebook page प्रसिध्दकरून जन जागृती करण्यात येते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावरून सामान्य जनतेसाठी सर्व माहिती उपलब्ध केली जात आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालयात जावून भेटी देवून माहिती देत असतात व त्यांच्या कार्यक्षेत्रातील आठवडे बाजार, एसटी स्टॅण्ड, रेल्वेस्टेशन, कॉलेज इत्यादी ठिकाणी जाऊन सुध्दा जनजागृती करत असतात. तसेच शासकिय कार्यालयाच्या दर्शनी भागावर लाचलुचपत प्रतिबंधंक विभागाबाबत माहिती प्रसिध्द केली जाते.

---

### अकोला (जि.अकोला) शहरातील विविध विभागाच्या शासकीय निवासस्थानांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३०) १२९७३३ (३०-११-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) शहरातील पोलिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वीज वितरण कंपनी, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व महसूल विभाग इत्यादी विभागाच्या शासकीय कर्मचा-यांच्या निवासस्थानांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवासस्थानांच्या दुरुस्तीची मागणी संबंधीत कर्मचा-यांनी वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे करुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने अकोला शहरातील शासकीय निवासस्थानांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरवून देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितरित्या करण्यांत येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण विभागात सन २०१७-१८ या दोन वर्षाच्या कालावधीत एकूण १७ पोलीस कर्मचाऱ्यांचा कर्तव्यावर असताना झालेला मृत्यु**

**(३१) १२९८४५ (०७-१२-२०१८). अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण विभागात सन २०१७-१८ या दोन वर्षाच्या कालावधीत एकूण १७ पोलीस कर्मचारी कर्तव्यावर असताना मृत्यूमुखी पडले असल्याचे अमरावती कल्याण शाखेच्या माहितीनुसार माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन कर्तव्य बजावत असताना मृत्यूमुखी पडलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या वारसाला नोकरीत सामावून घेण्याबाबत तसेच त्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच पोलीस यंत्रणेवर कामाचा अति ताण पडू नये म्हणून शासनाने कोणत्या स्वरुपाची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१९) :**

(१) सन २०१७ ते माहे ऑगस्ट २०१८ पर्यंत पोलीस अधीक्षक, अमरावती यांच्या आस्थापनेवरील एकूण १७ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे निधन झाले आहे. त्यापैकी १ कर्मचारी कर्तव्य बजावित असतांना त्यांचेवर प्राणघातक हल्ला झाल्याने शहीद झाले. उर्वरीत कर्मचा-यांचे आजारपण, अपघात, आत्महत्या यासारख्या कारणांमुळे निधन झाले आहे.

(२) पोलीस कल्याण निधीमार्फत १० पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. पोलीस कर्मचा-यांच्या वारसाला नोकरीत सामावून घेण्याबाबत एकूण १७ प्रकरणे आहेत.

| अ.क्र. | बाब | संख्या |
|---|---|---|
| i) | अनुकंपा तत्वावर जेष्ठता सूचीमध्ये नाव समाविष्ट | ४ |
| ii) | अर्ज केलेले वारस १८ वर्षापेक्षा कमी असल्याची संख्या | ३ |
| iii) | अपात्र व्यक्तींची संख्या | २ |
| iv) | कार्यवाही सुरु असलेली प्रकरणे | ३ |
| v) | अर्ज अप्राप्त असलेल्या व्यक्तींची संख्या | ४ |
| vi) | न्यायालयात प्रलंबित प्रकरण | १ |

(३) पोलीस यंत्रणेवर कामाचा ताण पडू नये म्हणून वेळोवेळी योग प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले जाते. तसेच वेळोवेळी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करुन पोलीस कर्मचा-यांच्या प्रकृतीची तपासणी करुन योग्य उपचार करण्याबाबत मार्गदर्शन केले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यातील शासकीय सेवेतील पदांसाठी अनुसूचित जमातीसाठी लागू करण्यात आलेले अतिरिक्त आरक्षणात कपात करण्यात आल्याबाबत**

**(३२) १२९८७१ (०५-१२-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यातील शासकीय सेवेतील पदांसाठी अनुसूचित जमातीसाठी लागू करण्यात आलेल्या अतिरिक्त आरक्षणात कपात करण्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धोरणाचा अभ्यास करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ९ सचिवांची समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी भागात अन्य विभागातील अधिकारी कर्मचारी जायला फारसे तयार नसतात त्यामुळे सन २०१४ ला शासनाने अधिसूचना काढली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) होय, दि. २७.८.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्यानंतर त्या जनजाती सल्लागार समिती पुढे ठेवून त्या मा.राज्यपाल महोदयांच्या निर्णयार्थ सादर करण्यात येईल.

---

**आमगांव व देवरी तालुक्यातील (जि. गोदिंया) येथील पोलीस स्टेशन व शासकीय निवासस्थानाच्या नवीन इमारतीच्या बांधकामांबाबत**

**(३३) १३०४११ (०६-१२-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगांव व देवरी तालुक्यातील (जि. गोदिंया) पोलीस स्टेशनच्या नवीन इमारतीचे बांधकाम, पोलीस अधिकारी व कर्मचा-यांसाठी नवीन शासकीय निवासस्थान तसेच चिचगड येथील पोलीस अधिकारी व कर्मचा-यांसाठी नवीन शासकीय निवासस्थान बांधण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ जुन, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत व निधी मिळणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) पोलीस ठाणे आमगांव येथे ७० निवासस्थानांचे बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई कार्यालयाकडे कार्यवाहीधीन आहे. सदर प्रकल्प निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येणार आहे. पोलीस ठाणे देवरी व चिचगड येथील निवासस्थान बांधकामाबाबतचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नायगाव (मुंबई) मुख्यालयातील पोलीस शिपायांना गत दीड वर्षभरापासून प्रवास भत्ता दिला गेला नसल्याबाबत**

**(३४) १३०६१३ (०८-१२-२०१८). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव (मुंबई) येथील सशस्त्र पोलीस दलाच्या मुख्यालयातील प्रतिनियुक्तीवर असलेल्या अंमलदारांना प्रवास भत्ताच मिळत नसल्याने त्यांच्यात नाराजी असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत सशस्त्र पोलीस दलाची मरोळ, वरळी, ताडदेव, नायगांव या ठिकाणी मुख्यालये असुन अंदाजे १२ हजार कर्मचारी येथे कार्यरत असुन त्यामध्ये नायगांव मुख्यालयात सुमारे ४ हजार कर्मचा-यांचा समावेश असुन अनेक अंमलदाराच्या प्रतिनियुक्तीवर पोलीस

मुख्यालयासह विविध ठिकाणी नियुक्ती करण्यात येते अशा मुख्यालयापासून ८ किलोमीटर अंतरावर नोकरी करत असलेल्या अंमलदारांना दोन हजार रुपये प्रवास भत्ता दिला जातो परंतू माहे फेब्रुवारी २०१७ पासून नायगांव पोलीस मुख्यालयातून प्रतिनियुक्तीवर असलेल्या अंमलदारांना प्रवास भत्ताच मिळत नसल्याने त्यांची आर्थिक कुंचबणा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून सदरहू अंमलदारांना प्रवास भत्ता देण्याबाबत कोणती आवश्यक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही,

अपर पोलीस आयुक्त, सशस्त्र पोलीस दल नायगांव, मुंबई कार्यालयातंर्गत सशस्त्र पोलीस - नायगांव/ ताडदेव/ वरळी/ मरोळी व कोळे-कल्याण अशी पाच प्रशासकीय कार्यालये असून, प्रवास भत्ता पोलीस अंमलदारांच्या विनंती व विहीत नमुन्यातील अर्ज सादर केल्यानंतर दिला जातो.

सशस्त्र पोलीस नायगांव, मुंबई (ल,विभाग-१) या कार्यालयाच्या आस्थापनेवरील एकूण ९०० पोलीस कर्मचारी प्रतिनियुक्तीवर अन्य कार्यालयात कर्तव्य बजावत आहेत.

बृहन्मुंबईतील वाहतुकीची समस्येच्या कारणास्तव प्रतिनियुक्तीवरील पोलीस अंमलदारांना कर्तव्याच्या ठिकाणी विहित वेळेत पोहचणे अडचणीचे ठरते. त्यामध्ये वेळेचा अपव्यय होतो. यास्तव वरिष्ठ अधिकारी स्तरावर याबाबत सहानुभुतीपूर्वक निर्णय घेण्यात येऊन, संबंधित प्रतिनियुक्तीवरील पोलीस अधिकारी/अंमलदार यांना माहे ऑगस्ट, २०१८ पासून प्रतिनियुक्तीवरील हजेरी देण्यातून सूट देण्यात आली आहे. त्याकरिता प्रतिनियुक्तीवरील कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडून प्रवासभत्त्याची मागणी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस असणाऱ्या पोलीस अंमलदारांचे प्रवास भत्त्याचे माहे ऑगस्ट, २०१८ च्या देयकाच्या रक्कमेचे प्रदान करण्यात आले असून, माहे, सप्टेंबर, २०१८ च्या प्रवासभत्त्याची देयके अधिदान लेखा कार्यालयात सादर करण्यात येत आहे.

---

**अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासाबाबत**

**(३५) १३०७८१ (०६-१२-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना एटीएसने माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान कारवाई करुन अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच दरम्यान महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने छापा टाकून नालासोपा-यातील भंडार आळीत कट्टर हिंदुत्ववादी सनातन संस्थेशी संलग्न असलेले श्री. वैभव राऊत यांच्या घरातून माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मोठ्या प्रमाणात स्फोटक पदार्थ असलेली गावठी बॉम्बसह गणपावडर व डिटोनेटर्स जप्त केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी करून सदरील प्रकरणातील दोषी असणा-या वैभव राऊत व सनातन संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, एटीएसने डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्याप्रकरणी आतापर्यंत किती आरोपींना अटक केली आहे व डॉ.दाभोलकर यांच्या हत्येतील आरोपी हे जेष्ठ विचारवंत कॉ.गोविंद पानसरे, एम.एम.कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांच्या हत्येमधील सुद्धा आरोपी आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, डॉ.दाभोलकर यांच्या हत्येच्या प्रकरणासह या तिन्ही हत्या प्रकरणी तपास पूर्ण झाला आहे काय व तपासात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येचा तपास दिनांक ३ जून २०१४ च्या अधिसूचनेन्वये केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (CBI) कडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

वैभव राऊत याचे रहाते घराच्या घरझडतीत स्फोटक साहित्य मिळून आले असून यासंदर्भात दहशतवाद विरोधी पथक पोलीस ठाणे, येथे गु.र.नं.११/२०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एकूण १२ आरोपीतांना अटक करण्यात आली असून त्यांच्या विरुध्द राष्ट्रीय तपास अभिकरण कायदा २००८ अन्वये स्थापन मा.विशेष सत्र न्यायालय, मुंबई येथे दिनांक ५/१२/२०१८ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

कॉ.पानसरे यांच्या हत्येच्या गुन्ह्यातील आरोपी विरेंद्र तावडे व अमोल काळे यांना डॉ.दाभोळकर हत्येच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. कॉ.पानसरे हत्येच्या गुन्ह्यातील आरोपी अमोल काळे याला गौरी लंकेश यांच्या हत्येच्या गुन्ह्यातही अटक करण्यात आली आहे.

कॉ.पानसरे यांच्या हत्येच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेला आरोपी समीर गायकवाड याच्या विरुध्द दि.१४/१२/२०१५ रोजी व आरोपी डॉ.विरेंद्र तावडे याच्याविरुध्द दि.२९/११/२०१६ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच इतर ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सद्यस्थितीत गुन्हा तपासावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(३६) १३०८०६ (०५-१२-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन अस्तित्वात आल्यापासून खाजगी जागेत भाड्याच्या इमारतीत सुरू असून इमारतीच्या भाड्यापोटी शासनाला मोठा भुर्दंड सोसावा लागत असल्यामुळे सदरहू स्टेशनसाठी जागा उपलब्ध करून तात्काळ निधी मंजूर करावा अशी मागणी स्थानिक मा. लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार शासनाने सदर पोलीस स्टेशनसाठी जागा व निधी उपलब्ध करून दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस स्टेशनच्या इमारतीचे बांधकाम सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाने उदगीर पोलीस ठाण्याच्या प्रशासकीय इमारत बांधकामासाठी मे. अभय काटकर ॲण्ड असो. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती केलेली आहे. निधी उपलब्धतेनुसार सदर प्रकल्पाचे बांधकाम हाती घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मे. जेएसडब्ल्यु जयगड पोर्ट लि. कंपनीने सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इंस्टिट्यूट (CMFRI) ने तयार केलेला अहवाल उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३७) १३१४२८ (११-१२-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे. जेएसडब्ल्यु जयगड पोर्ट लि. कंपनीने बंदर विकास प्रकल्पामुळे बाधित झालेल्या मच्छिमार कुटुंबांच्या संदर्भात नेमकी काय नुकसानभरपाई दिली याची सविस्तर माहिती मा.लोकप्रतीधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास पत्रान्वये जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडे मागितली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.लोकप्रतीनिधी यांच्या पत्राच्या अनुषंगाने प्रादेशिक बंदर अधिकारी रत्नागिरी व सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय रत्नागिरी यांचे कार्यालयाने मौजे जयगड येथील सर्व्हेक्षणाबाबत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इंस्टिट्यूट (CMFRI) यांचेकडे संपर्क साधला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इंस्टिट्यूटचा (CMFRI) अहवाल दिनांक ३१ जुलै, २०१८ रोजीपर्यंत तयार करून मा.लोकप्रतीनिधी यांना उपलब्ध करून देण्यात येईल अशा आशयाचे पत्र प्रादेशिक बंदर अधिकारी रत्नागिरी व सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय रत्नागिरी यांचे कार्यालयाने दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.लोकप्रतीनिधी यांना अद्यापपर्यंत सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इंस्टिट्यूटच्या अहवालाची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली नाही आणि प्रशासन जाणीवपूर्वक सदर अहवाल तयार करण्यास दिरंगाई करीत आहे, हे ही खरे आहे काय ,

(५) असल्यास, सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इंस्टिट्यूटचा (CMFRI) अहवाल मा. लोकप्रतिनिधी यांना उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१९) :** (१), (२) व (३) होय.

(४) व (५) सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इन्स्टिटयुटचा (CMFRI) अहवाल जेएसडब्ल्यु जयगड पोर्ट प्रा.लि. यांच्याकडून दिनांक २५.१.२०१९ रोजी प्राप्त झाला असून, प्रादेशिक बंदर अधिकारी, रत्नागिरी यांच्यामार्फत सदर अहवाल लोकप्रतिनिधी यांना दिनांक २५.१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पाचोरा व भडगांव (जि. जळगावं) तालुक्यातील विकास कामांसाठी वाळूगट राखीव ठेवण्याबाबत

**(३८) १३१९४४ (३०-११-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा व भडगांव (जि. जळगावं) तालुक्यातील अनेक विकास कामे वाळू अभावी रखडली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सदरच्या विकास कामाकरिता वाळू उपलब्ध होण्यासाठी उक्त तालुक्यातील गट राखीव ठेवण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरूप व याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) शासन निर्णय, दि.३ जानेवारी,२०१८ रोजीच्या सुधारित वाळू/रेती निर्गती धोरणातील परिच्छेद-४ नुसार जिल्हाधिकारी यांना राज्य शासनाच्या जलसंपदा, जलसंधारण किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखी मागणीनुसार प्रकल्पासाठी वाळूगट राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालयाच्या दि.१५/१/२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार ० ते ५ हेक्टर क्षेत्रातील वाळूगटांसाठी पर्यावरण अनुमती जिल्हास्तरीय पर्यावरण समिती यांच्यामार्फत देण्याची तरतूद आहे. तथापि, सदर अधिसूचनेस मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने त्यांच्या दि.११/१२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये नविन

अधिसूचना प्रसिध्द होईपर्यंत निलंबित केले आहे. त्यामुळे सर्व वाळूगटांच्या पर्यावरण मान्यतेचे प्रस्ताव राज्यस्तरीय पर्यावरण समितीसमोर सादर करणेबाबत दि.१५/१२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार वाळू लिलाव सन २०१८-१९ साठी प्रस्तावित वाळूगटांच्या पर्यावरण मान्यतेचे प्रस्ताव राज्यस्तरीय पर्यावरण समितीसमोर सादर करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) मतदारसंघातील रस्ते व पुलांची कामे करण्याबाबत**

**(३९) १३२१२१ (३०-११-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) या मतदार संघातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील माका-शिरसगाव रस्ता, घोडेगाव ग्रामीण रुग्णालय, वाटाफर येथील मोठ्या पुलाचे काम इत्यादी अनेक कामे २५१५ लेखाशिर्ष, गट 'ब' रस्ते दुरुस्ती अंतर्गत एक ते दिड वर्षापासून मंजूर असून सदर कामे अद्याप सुरु झाली नाही आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची कामे सुरु करून तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

बहुतांशी कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामे निधीच्या उपलेब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दारूविक्रीस प्रोत्साहन देणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(४०) १३२४४१ (०७-१२-२०१८). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी असूनही जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या कार्यालासमोर दारु विकली जात असून माहे ऑक्टोंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केलेल्या कारवाईत सदर दुकानात मोठ्या प्रमाणात दारु पकडली गेली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या प्रकरणात अटक झालेल्या मुलाने पोलिस अधीक्षक कार्यालयासमोरील गाईन नावाच्या महिलेकरिता नेहमीच दारू आणून देतो हे सांगूनही त्या महिलेला अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा. लोकप्रतिनिधींनी दोषींवर कारवाईचे पत्र देऊनही दोषींकडून हप्ता मिळविण्याच्या उद्देशाने कारवाई न करता चुकीचे उत्तर दिले जाते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी असणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांसह संबंधित दारू विक्रेत्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१९) :** (१) व (२) सदर प्रकरणी दारुबंदी कायद्या अंतर्गत दिनांक ९/०८/२०१६ रोजी अप.क्र.६१६४/२०१६ तसेच दिनांक १८/११/२०१६ रोजी अप.क्र.६३५६/२०१६ असे मुंबई दारु बंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये दोन गुन्हे दाखल आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) सदर प्रकरणी चौकशी केलेली असून सदर चौकशीत कोणतेही पोलीस अधिकारी दोषी आढळून न आल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयासह राज्यातील शासकीय वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४१) १३२५३४ (३०-११-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयासह राज्यातील इतर शासकीय वसाहतींची वेळेवर देखभाल व दुरुस्ती होत नसल्यामुळे या शासकीय वसाहतींची दुरवस्था झाली असल्यामुळे या वसाहतीत राहत असलेले कर्मचारी व त्यांच्या कुटुंबाना जीवाचा धोका पत्करून राहावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करून राज्यातील दुरावस्था झालेल्या शासकीय वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार देखभाल दुरुस्तीची कामे वेळो-वेळी हाती घेण्यांत येतात.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामधील निदेशकांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत**

**(४२) १३३०२६ (१०-१२-२०१८) कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) मधील निदेशकांची सध्या ४ हजार ४०० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूरमधील आयटीआय मध्ये ५० निदेशकांच्या जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे प्रशिक्षणावर विपरीत परीणाम होऊन विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेवून सदर रिक्त जागा भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२६-०२-२०१९) :** (१) सद्य:स्थितीत राज्यामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील शिल्प निदेशक, गणित निदेशक, चित्रकला निदेशक, गणित व चित्रकला निदेशक यांची एकूण ६१६२ मंजूर पदे असून त्यापैकी ४३२७ पदे भरलेली व १८३५ पदे रिक्त आहेत.

(२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर मध्ये नियमित वेतनश्रेणीतील गटनिदेशक, शिल्पनिदेशक, गणित निदेशक व चित्रकला निदेशकाची एकूण ६४ पदे मंजूर असून ४२ पदे भरलेली व २२ पदे रिक्त आहेत. तसेच, कंत्राटी तत्वावरील गटनिदेशक १ , शिल्पनिदेशक १३ व गणित तथा चित्रकला निदेशक १ अशी एकूण १५ पदे मंजूर असून त्यापैकी १ पद भरलेले आहे व १४ पदे रिक्त आहेत.

(३) नाही, हे खरे नाही.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर मध्ये गटनिदेशक १, शिल्पनिदेशक १८, गणित निदेशक २ व चित्रकला निदेशक १ अशी एकूण २२ नियमित पदे व कंत्राटी तत्वावरील गटनिदेशक १, शिल्पनिदेशक १२, गणित तथा चित्रकला निदेशक १ एकूण १४ पदे अशी एकूण ३६ रिक्त पदांपैकी शिल्पनिदेशक (ठोक वेतनावर) १ पद, शिल्पनिदेशक (सेवावर्गाने) ३ पदे व शिल्पनिदेशक (तासिका तत्वावर) २६ पदे अशी एकूण ३० पदे भरण्यात आलेली आहे. उर्वरित ६ पदे रिक्त आहेत. परिणाम स्वरुप प्रशिक्षणार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यांत आलेली आहे.

(४) व (५) रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात दिनांक २९.०८.२०१४ व दिनांक १३.०९.२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील रिट पिटिशन क्रमांक ११०५५/२०१६ बाबत दिनांक २३.११.२०१६ चे

अंतरिम आदेशान्वये शिल्पनिदेशक पदे वगळून इतर पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. सदर रिट पिटिशनचा अंतिम निकाल दिनांक २२.०८.२०१७ रोजी दिला असून सदर आदेशान्वये शिल्पनिदेशक पदाची जाहिरात रद्द केलेली आहे. त्यामुळे शिल्प निदेशक पदाची पदभरती करता आली नाही.

शासनाने वेळोवेळी घातलेल्या निर्बंधामुळे रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करता आलेली नाही.

---

**राज्य राखीव पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या राज्य पोलीस दलात बदली करण्याकरीता विहित अटी व शर्ती मध्ये बदल करण्याच्या मागणीबाबत**

**(४३) १३३०९१ (०६-१२-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य राखीव पोलीस दल नियम १९५९ च्या नियम ६८ व ६९ अन्वये राज्य राखीव पोलीस दलातून राज्य पोलीस दलात बदलीकरिता सेवेच्या अटी व शर्ती विहित करण्यात आल्या असून त्यानुषंगाने शासन परिपत्रक, गृह विभाग क्र. एसआरएफ ०९००/ २२३६/ प्र.क्र.६६/ पोल.३ दिनांकित १०/९/२००१ अन्वये " राज्य राखीव पोलीस दलामधील ज्या पोलीस कर्मचाऱ्यांची सेवा राज्य पोलीस दलामध्ये १० वर्षाहून जास्त झालेली आहे असे पोलीस कर्मचारी अशा बदलीस पात्र होतील" असा शासनाने आदेश काढलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य राखीव पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या राज्य पोलीस दलात बदली करण्याकरीता विहित अटी व शर्ती या विषयानुषंगाने गृह विभाग, म.शा. शासन शुद्धीपत्रक क्र. पी.एम.एन - ०३१४/ २०३ / प्र.क्र.६८ पोल. ५ ब. मंत्रालय दिनांकित २१ ऑक्टोबर, २०१६ अन्वये मूळ शासन परिपत्रक गृह विभाग, क्र. एसआरएफ - ०९०० / २२३६ / प्र.क्र. ६६ / पोल - ३ दि. १९/९/२००१ मधील अनुक्रमांक १ व २ सुधारणा करण्यात आली असून १० वर्षाऐवजी १५ वर्षाचा सेवाकाल बदलीस पात्र ठरतील असे आदेशित करण्यात आल्याने राज्य राखीव पोलीस दलातील कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याने, राज्य राखीव पोलीस दलातून १५ वर्षे ऐवजी १० वर्षाने जिल्हा पोलीस दलात बदली होण्याबाबतच्या मागणीचे एक निवेदन मा. मुख्यमंत्री, मा. गृहराज्यमंत्री, प्रधान सचिव, गृहविभाग, महाराष्ट्र पोलीस महासंचालक, म.शा. आदिकडे महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेमार्फत माहे ऑगस्ट, २०१८ रोजी वा सुमारास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१९) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) राज्य राखीव पोलीस बलात अनुभवी पोलीस कर्मचारी उपलब्ध रहावेत म्हणून बदलीबाबतची मर्यादा १५ वर्ष केली आहे. याचा फायदा राज्य राखीव पोलीस बलाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी होणार आहे. विशिष्ठ शाखेत भरती झालेल्या कर्मचा-याने त्याच शाखेत काम करणे अपेक्षीत आहे. सशस्त्र पोलीस दलातून बदली करणे हि बाब पोलीसांचे कल्याण या सदरात मोडते. त्यामुळे शासनाने विचारांती १० वर्षाएवजी १५ वर्षांचा सेवाकाल पूर्ण करणारे कर्मचारी बदलीस पात्र ठरतील असे आदेश निर्गमित केलेले आहेत.

---

## पुणे शहरात नोकरी मार्गदर्शन शिबिराद्वारे तरुणांची होणारी फसवणूक

**(४४) १३३१०३ (१०-१२-२०१८). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात स्वयंरोजगार हे नाव देऊन स्थानिक वर्तमानपत्रात मोठ्या जाहिराती देऊन तरुणांकडून नोंदणी शुल्कच्या नावाखाली ऑनलाईन पद्धतीने किंवा ऑफलाईन पद्धतीने तरुणांकडून पैसे भरून घेतले जातात आणि मुलाखतीला बोलवतो म्हणून संदेश (मॅसेज) पाठविले जातात पण संबंधित ठिकाणी गेले असता तेथे काहीही आढळून येत नसून आपली फसवणूक झाली आहे असे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरामध्ये अशा फसवणूकीच्या किती घटना झाल्या आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१९) :** (१), (२) व (३) पुणे शहरात स्वयंरोजगार हे नाव देऊन स्थानिक वर्तमानपत्रात मोठ्या जाहिराती देऊन तरुणांकडून नोंदणी शुल्कच्या नावाखाली ऑनलाईन पध्दतीने किंवा ऑफलाईन पध्दतीने तरुणांकडून पैसे भरुन घेतल्याबाबत बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं.१३८/२०१८ भा. दं. वि. कलम ४२० प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्यातील फसवणूक झालेली रक्कम व आरोपी मिळून न आल्याने सदरचा गुन्हा कायम तपासावर असून अ वर्ग समरी मंजुरीसाठी मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचेकडे अहवाल पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना येथे महिलेवर अत्याचार करून पाच लाख रुपयात विक्री करण्याचा केलेला प्रयत्न**

**(४५) १३३१२६ (१०-१२-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथे काम मिळवून देण्याच्या नावाखाली महिलेला नेऊन एका लॉजमध्ये तिच्यावर अत्याचार केल्यानंतर पाच लाख रुपयात विक्री करण्याचा प्रयत्न करणा-या दोन जणांना मुकुंदवाडी पोलिसांनी माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मुंकुदवाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासन स्तरावर पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून मुकुंदवाडी पोलीस ठाणे, औरंगाबाद येथे गु.र.नं. २९५/१८ भा.दं.वि. कलम ३७६ (२) (N), ३७०, ५०६, ३४ प्रमाणे दिनांक ०२/१०/२०१८ रोजी आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. १ यास दिनांक ०२/१०/२०१८ रोजी व आरोपी क्र. २ हिस दिनांक २५/११/२०१८ रोजी अटक करण्यात आली. सध्या दोन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपीतांविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलेले असुन सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी येथील भगवती बंदर येथील पत्तन कार्यालयाची झालेली दुरवस्था**

**(४६) १३३५५१ (११-१२-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील भगवती बंदर येथील पत्तन कार्यालयाची अत्यंत दुरवस्था झालेली असून येथील कर्मचा-यांना पिण्यासाठी पाणी, वीज, आदि सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याचे तसेच इमारतीच्या खिडक्या, दरवाजे, फर्निचर मोडकळीस आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत चार वर्षापासून उक्त कार्यालयाच्या इमारतीची दयनीय अवस्था झाली असूनही दुरुस्तीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) सद्यःस्थितीत पत्तन अभियंता यांना शासकीय जागा उपलब्ध नसल्याने ह्या इमारतीमध्ये पत्तन अभियंता यांचे कार्यालय कार्यरत आहे. आवश्यकतेप्रमाणे पाहणी करुन दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील एक्सिनो कॅपिटल कंपनीच्या संचालकांना एका तरुणीने दिलेल्या धमकीबाबत**

**(४७) १३३७३८ (१०-१२-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर, न्यू वर्मा लेआऊट निवासी आर.एम.कृष्णन या एक्सिनो कॅपिटल नावाच्या कंपनीच्या संचालकाला पन्नास लाख रुपये द्या किंवा कंपनीत डायरेक्टर बनवा अन्यथा लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार पोलिसांत देईन अशी धमकी एका तरुणीने दिली असता नागपूर येथील अंबाझरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तरुणीने याआधी श्री.कृष्णन यांना ब्लॅकमेल करून रुपये २ लाख ३३ हजार घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून दोषी तरुणीवर पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) फिर्यादी आर. एम. कृष्णन यांच्या तक्रारीवरुन आरोपी तरुणीने खोट्या केस मध्ये फसवेण व बदनामी करुन कंपनी बरबाद करेल अशी धमकी देऊन रु.२ लाख ३३ हजार घेतल्या प्रकरणी दिनांक ३०/७/२०१८ रोजी अप.क्र.१७३/१८ कलम ३८३, ३८५ भादवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धामणगांव (ता.कोपरगांव, जि.अहमदनगर) प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) १३३८४२ (२९-१२-२०१८). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगांव (ता.कोपरगांव, जि.अहमदनगर) प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०२-२०१९) :** (१) होय,
(२) व (३) धामणगांव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची ७५ % कामे पूर्ण झाली आहेत. योजना पुर्नसुधारित करणे आवश्यक असल्याने योजनेची अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**कणेरी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(४९) १३३८७१ (२९-१२-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणेरी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत मंजूर नळ पाणी पुरवठा योजनेच्या मंजूर कामाची निविदा प्रक्रिया जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेमार्फत करण्यात येत असून काही ठेकेदारांनी निविदा सादर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असून अपात्र असणाऱ्या ठेकेदारांच्या निविदा पात्र केल्या असल्याच्या अनेक तक्रारी संबंधित कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारींवर संबंधित कार्यालयाकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याने सदर निविदा प्रक्रियेस स्थगिती देवून निविदा प्रक्रियेची चौकशी होणे तसेच यांस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (११-०२-२०१९) :** (१) होय. परंतु मौ.कणेरी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) पाणी पुरवठा योजनेची निविदा प्रक्रिया मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत करण्यात आली आहे.
(२) होय. याबाबत केवळ श्री.सत्यजीत पाटील, विधानसभा सदस्य यांनी दिनांक २२.१०.२०१८ रोजी लेखी तक्रार केली आहे.
(३) मौ.कणेरी पाणी पुरवठा योजनेची निविदा दि.११.०९.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली

होती. सदर ई-निवदा प्रक्रियेत ५ मक्तेदारांनी भाग घेतला होता परंतु ४ मक्तेदारांकडून कामाच्या अनुभवाबाबत कागदपत्राची पुर्तता न झाल्याने ते पात्र ठरले नाहीत. त्यामुळे निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली व दि.२९.११.२०१८ रोजी फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यामध्ये ६ मक्तेदारांनी भाग घेतला असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के कमी दराची श्री.युवराज रसाळ यांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेड तालुक्याच्या (जि.पुणे) हद्दीमधे झालेल्या खुनांच्या घटनांचा अद्‌याप तपास लागला नसल्याबाबत

**(५०) १३४११९ (०६-१२-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यामधे सन २०१० ते सन २०१८ दरम्यान मोठ्या प्रमाणात खून, बलात्कार,घरफोड्या, जबरी चोऱ्या,जुगार ,मटका यांचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढलेल्या या घटनांमधे दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास खराबवाडी येथे झालेली महिलेची हत्या, माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पाळू येथील श्रीमती सीताबाई तुकाराम गावडे यांची झालेली हत्या , दिनांक ९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारस महाळुंगे येथे दरोड्यात झालेल्या व्यक्तीची हत्या , दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास धामणे येथील युवतीची झालेली निर्घुण हत्या तसेच सन २०१० साली चिंचोशी येथील चिमूरडीची झालेली निर्घुण हत्या अशा या खूनाच्या प्रकरणांचा तपास पुर्ण करण्यास पोलीस प्रशासनास अद्यापही यश आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खुणांचा तपास करण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१९) :** (१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील खेड, चाकण, आळंदी या पोलीस ठाण्यात खून, बलात्कार, घरफोडी, जबरी चोऱ्या जुगार अंर्गत सन २०१० ते नोव्हेंबर २०१८ दरम्यान दाखल गुन्हे, उघड गुन्हे यांची माहिती खालीलप्रमाणे.

| | खून | बलात्कार | घरफोडी | जबरी चोरी | जुगार मटका |
|---|---|---|---|---|---|
| दाखल | १७५ | १३७ | ६०१ | १३६ | २९१ |
| उघड | १४३ | १३५ | ७४ | १०७ | २९१ |

(२) व ३) दिनांक ७ जुलै २०१७ रोजी मौजे खराबवाडी गावच्या हद्दीत झालेल्या महिलेच्या हत्येबाबत चाकण पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.६३४/१७ भादंवि ३०२ अन्वये गुन्हा दाखल आहे. गुन्हा तपासावर आहे.

दिनांक १०/१०/२०१७ रोजी पाळू गावाचे हद्दीत श्रीमती सीताबाई तुकाराम गावडे यांच्या खुनाबाबत चाकण पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१०२७/२०१७ भादंवि कलम ३०२, ३०७ अन्वये गुन्हा दाखल आहे. गुन्हा तपासावर आहे.

दिनांक ९/१२/२०१७ रोजी महाळुंगे गावचे हद्दीत शिवाजी गुलाबराव शिवळे यांचा घरफोडी दरम्यान खून करण्यात आला. यासंदर्भात अज्ञात व्यक्ती विरुध्द चाकण पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१२४६/२०१७ भादंवि कलम ४५७, ३८०, ४६० अन्वये गुन्हा दाखल आहे. गुन्हा तपासावर आहे.

दिनांक १/१२/२०१७ रोजी मौजे धामणे येथील युवतीच्या खूनाबाबत चाकण पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१२१८/२०१७ भादंवि कलम ३६३, ३०२, २०१, ३७६(१) (ड) सह पॉस्को कायदा कलम ४, ६ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. गुन्हा तपासावर आहे.

दिनांक १६/०५/२०१० रोजी चिंचोशी येथील चिमूरडीच्या हत्येप्रकरणी चाकण पोलीस स्टेशन येथे गु. र.क्र.१३३/२०१० भा. दं. वि. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास गुन्हे अन्वेषण विभागामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.